# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २०४-२३** **दिनांक : - २८/०६/२०२३**

## खुनाचा प्रयत्न व फायरिंग करणा-या आरोपीतास ४८ तासांत अटक. नायगाव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १५/०६/२३ रोजी दुपारी १४:४५ वा. चे सुमारास भारत लॅडर कंपनी, बेलकडी गांव, कामण नायगाव येथे फिर्यादी नामे सक्रुददीन चौधरी हे त्यांचे लहान जावई सलीम अली टोले व मॅनेजर खुर्शीद अन्सारी यांच्यासह ॲल्युमिनीयमच्या कंपनीमध्ये काम करीत असतांना फिर्यादी यांचा मोठा जावई इब्राईम हसन शेख, रा. कामण हा त्याचे हातामध्ये चाकु व लोखंडी रॉड घेवून आला व काहीएक न बोलता लहान जावई सलीम टोले यांस चाकुने वार करुन गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादी हे त्यांना सोडविण्यासाठी गेले असता जावई इब्राईम शेख याने त्यांना देखील जिवे ठार मारण्याच्या इरादयाने त्यांचे मानेवर चाकुने वार तसेच चाकुने फिर्यादीच्या डोक्याचे वरील बाजुस वार करुन गंभीर जखमी केले. त्याचप्रमाणे इब्राईम शेख याने त्याचे हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीच्या पोटावर, पाठीवर जबर मारहाण करुन जखमी केल्याबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने वर नमूद आरोपीताविरुध्द नायगाव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. I १४६/२०२३ भां.दं.वि.सं. कलम ३०७, ३२६, ३२४ म.पो.का. कलम १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील फिर्यादी यांनी आरोपीत नामे इब्राईम हसन शेख याच्याविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केल्याचा राग मनात धरुन आरोपीत नामे इब्राईम हसन शेख याने कामण गावचे हददीत फिर्यादी यांचे घराजवळ ता.वसई जि.पालघर येथे दिनांक १५/०६/२०२३ रोजी २१.०० वा.चे सुमारास बिनापरवाना १२ बोअरचे बंदुकीतून साक्षीदार यांचे घराचे पहिल्या माळयावर असलेल्या खिडकीच्या काचेवर दोन राऊंड फायर (गोळीबार) करुन खिडकीची काच फोडून नुकसान केले. सदरबाबत नायगाव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. १४७/२०२३ भा.ह.का.कलम २७ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा घडल्यापासुन यातील आरोपीत हा सदर परिसरातील जंगलात परागंदा झाला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून सदर गुन्हा उघडकीस आणण्याकरीता वरिष्ठांनी गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सुचना व मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकाची वेगवेगळी पथके नियुक्त करुन कामन परिसरातील डोंगरी परिसरामध्ये आरोपीताचा शोध घेत असताना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपीत नामे इब्राहीम हसन शेख, वय ४५ वर्ष, रा. कामण यास मनोर पालघर येथून ताब्यात घेवुन नमूद गुन्हयात दिनांक १७/०६/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. नमूद आरोपीकडून गुन्हयात वापरलेली एक गावठी बंदुक, १२ बोंअर बंदुकीची एकूण तीन जिवंत काडतुसे तपासकामी जप्त करण्यात आली आहेत.

सदरची कामगिरी श्रीमती पौणिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाणचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पो.नि. श्री. मिलींद साबळे (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. संतोष सांगवीकर, रोशन देवरे, पो.हवा. देविदास पाटील, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील यांनी केली आहे.

**----0000----**